# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (प्र-कुलगुरु कार्यालय)


डॉ. श्रीराम. एस.कावळे
एम.ए.(अर्थशास्त्र), पीएच.डी..एम.कॉम. डी.बी.एम.
जी.डी.सी. ॲन्ड ए. ( प्र-कलगरू)

एम.आय.डी.सी.रोड कॉम्पलेक्स गडचिरोली-४४२६०५ (म.रा)
दुरध्वनी क्र.०७१३२-२२२२५७
ई.मेल- provc.gug@gmail.com, pvc@unigug.ac.in


जा.क्र. गोविग/प्र.कुल.का/ २९० /२०२४ दि. १९/०१/२०२४

प्रति,
सर्व प्रशिक्षक
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०

**विषय:- स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) अंतर्गत ToT प्रशिक्षक म्हणून निवडीबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपली **ToT प्रशिक्षक** म्हणून निवड करण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२४/प्र. क्र.०१/विशि-३ दिनांक ०५ जानेवारी, २०२४ नुसार बाब क्रमांक (ब) आणि (क) नुसार निर्देशित कार्य पार पाडावे व त्याबाबतचा सर्वकक्ष अहवाल कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर विद्यापीठास सादर करावा. यासंदर्भात आपणास विद्यापीठ नियमानुसार मानधन व प्रवासभत्ता देय राहिल, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र :- १) शासन निर्णय**
**२) कार्यक्रमाचे वेळापत्रक**

डॉ. श्रीराम एस. कावळे
(प्र-कुलगुरु)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

| अनु. क्र. | प्रशिक्षकाचे नाव | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|
| १) | डॉ. सतिश एस. कोला | महात्मा गाधी महाविद्यालय आरमोरी |
| २) | नियाज शब्बीर शेख | ईस्टीटयुट ऑफ मॅनेजमेट चंद्रपुर |
| ३) | डॉ. विवेक एस. गोरलावार | फुले आंबेडकर महाविद्यालय गडचिरोली |
| ४) | डॉ. विकास एम. मोहुर्ले | राष्ट्रपीता महात्मा गांधी& सॉयन्स कॉलेज |
| ५) | डॉ. अनंत एस. देशपांडे | चिंतामणी महाविद्यालय, & सॉयन्स पोंभुर्णा |
| ६) | डॉ. संजय निंबाळकर | एस आर. एम महाविद्यालय सोशल वर्क पडोली चंद्रपुर |
| ७) | डॉ. जयेश चक्रवती | ईस्टीटयुट ऑफ मॅनेजमेट चंद्रपुर |
| ८) | डॉ. कीशोर एस. नाकतोडे | नेवजाबाई हीतकारीणी महाविद्यालय ब्रम्हपुरी |
| ९) | डॉ. निलेश एस. उगेमुगे | आनंद निकेतन महाविद्यालय,वरोरा |
| १०) | डॉ. सपना आर. वेगीनवार | सरदार पटेल महाविद्यालय |
| ११) | डॉ. शर्या एम. पोतनुरवार | आदर्श ऑटर्स&कॉमर्स महाविद्यालय वडसा |
| १२) | डॉ. श्रीराम जी. गहाणे | आदर्श ऑटर्स&कॉमर्स महाविद्यालय वडसा |
| १३) | श्री. राहुल के खोब्रागडे | जि.परीषद हायस्कुल&ज्युनियर कॉलेज गडचिरोली |
| १४) | श्री. पी एन. ठाकरे | रानी दुर्गावती गर्ल्स जुनियर कॉलेज, गडचिरोली |
| १५ | श्री. एम बी. भगत | डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपुर |
| १६) | श्री.डी. डी मुनघाटे | एस पी. ज्युनियर कॉलेज गोगाव |
| १७) | डॉ. यु टी. कांबळे | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| १८) | डॉ. उत्तमचंद कांबळे | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| १९) | डॉ. छगन डी. मुंगमोडे | एम. जी. कॉलेज आरमोरी |
| २०) | डॉ. आर आर. खेरानी | श्री. शिवाजी कॉलेज राजुरा |
| २१) | डॉ. डी. एच. गहाने | एन एच. कॉलेज ब्रम्हपुरी |
| २२) | डॉ. बिना मुन | डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपुर |
| २३) | डॉ. जे.पी देशपांडे | आदर्श ऑटर्स&कॉमर्स महाविद्यालय वडसा |
| २४) | डॉ. आय एस. कोंड्रा | जनता महाविद्यालय, चंद्रपुर |
| २५) | डॉ. पी. अरुणप्रकाश | वाय पी कॉलेज, तळोधी |
| २६) | डॉ. केशव एम. बैरागी | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| २७) | डॉ. संजय डफ | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| २८) | श्री. विकास ए चित्ते | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| २९) | श्री. शिवाजी चेपटे | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| ३०) | डॉ. मृणाल काळे | आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा |
| ३१) | डॉ. लालसिंग खालसा | महात्मा गाधी महाविद्यालय आरमोरी |
| ३२) | संदीप आर. देशमुख | राष्ट्रपीता कॉलेज सावली |
| ३३) | डॉ. नंदकिशोर मने | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| ३४) | डॉ. देवदत्त एस.तारे | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| ३५) | डॉ. रजनी वाढई | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| ३६) | डॉ. प्रिया डी. गेडाम | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गड |
| ३७) | डॉ. हेमंत बारसागडे | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| ३८) | डॉ. रुपेन्द्रकुमार गौर | फुले आंबेडकर महाविद्यालय गडचिरोली |
| ३९) | | |
| ४०) | | |
| ४१) | | |

Scanned with OKEN Scanner

Schedule for the NEP COnnect Drive Jan 2024

| District | Taluka HQ | Date | Shift | Resorce Person/s | Contact details | Local Oranizing College | Coordinator and contact deatails |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Gadchiroli | 1 Gadchiroli | **19-01-2024** | D | | | Shivaji Mahavidyalaya, Gadchiroli | |
| | 2 Armori | 24-01-2024 | D | Dr D H Gahane /Chitte Sir | | Mahatma Gandhi arts sci and commerce college,Armori | |
| | 3 Wadsa | 24-01-2024 | M | Dr D Gahane /Chitte Sir/ Dr. Mohture | | Adarsh Arts And Commerce Mahavidyalay,Wadsa | |
| | 4 Kurkheda | 23-01-2024 | D | Dr. S. G. Gahane / Wadhai mme /Chepate Sir | | shri. Govindrao Munghate arts & science college kurkheda. | |
| | 5 Korchi | 23-01-2024 | M | Dr. S. G. Gahane / Wadhai mme /Chepate Sir | | Vanashree Arts Mahavidyalay, Korchi, Distt. Gadchiroli | |
| | 6 Dhanora | 25-01-2024 | M | Chepate Sir | | Shri. Jivanrao Sitaram Patil Munghate Arts, Comm. & Science College ,Dhanora | |
| | 7 Chamorshi | 25-01-2024 | D | Tare Sir/ Mane Sir | | Shiwaji Jr.College ,Chamorshi | |
| | 8 Mulchera | 24-01-2024 | D | Bairagi Sir | | Netaji Subhashchandra Science College, Mulchera | |
| | 9 Etapalli | 24-01-2024 | M | Bairagi Sir | | Bhagwantrao Arts & Science College Etapalli | |
| | 10 Sironcha | 23-01-2024 | D | Kambale Sir/ Dr Kondra Sir | | Bhagwantrao Arts College , Sironcha | |
| | 11 Bhamaragarh | 23-01-2024 | M | Gedam mme | | Raje visshveshvarrao college of arts and commerce,Bhamragad | |
| | 12 Aheri | 23-01-2024 | D | Tare Sir /Gedam mme | | Shankarrao Bezalwar Arts And Commerce Mahavidyalay, Aheri, Distt. Gadchiroli | |
| | 1 Chandrapur | 23-01-2024 | D | Khalasa Sir Daff Sir | | Janta Mahavidyalay, Chandrapur | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Chandrapur | 2 Ballarpur | 23-01-2024 | M | Chitte Sir | | Mahatma Jyotiba Fule Mahavidyalay,Ballarpur | |
| | 3 Rajura | 25-01-2024 | M /D | Kambale Sir/ Dr Kondra Sir | | Shri. Shivaji Arts, Commerce And Science College, Rajura | |
| | 4 Jiwati | 24-01-2024 | M | Kambale Sir/Dr Kondra Sir | | Vidrbha College of art commerce and Science ,Jiwati | |
| | 5 Gadchandur | 24-01-2024 | D | Potnurwar mme/Dr. Weginwar/ | | Mahatma Gandhi Science Mahavidyalay, Gadchandur | |
| | 6 Bhadrawati | 23-01-2024 | D | Tare Sir | | Nilkantharao Shinde Science & Arts College, Bhadrawati | |
| | 7 Warora | 23-01-2024 | M | Tare Sir | | Anand Niketan Arts, Commerce And Science College,Warora. | |
| | 8 Chimur /Bhisi | 24-01-2024 | M | Wadhai mme/ Dr. Ugemuge /Dr Moon | | Rashtrasant Tukadoji Mahavidyalay chimur | |
| | 9 Nagbhir/ Talodhi | 24-01-2024 | D | Dr. Kale /Wadhai mme/ Dr. Mungmode | | Mahatma Gandhi arts sci and commerce college,Nagbhid. | |
| | 10 Brahmapuri | 24-01-2024 | M | P Arunaprakash Sir/ Dr Tare Sir/ DR. Gour | | Nevjabai Hitkarni Mahavidylay, Bramhpuri | |
| | 11 Sawali | 25-01-2024 | D | Mane Sir/ Nagodev Sir/ Dr. Kola/ Dr. Gorlawar | | Rashtrapita Mahatma Gandhi Arts And Commerce College, Saoli | |
| | 12 Sindewahi | 24-01-2024 | M | p Arunaprakash/ | | Sarvoday Arts, Commerce And Science College, sindewahi | |
| | 13 Mul | 25-01-2024 | D | Kambale Sir/ Dr Niyaz Shikh | | Karmaveer Mahavidyalay, mul | |
| | 14 Pombhurna | 25-01-2024 | M | Dr Patil Sir/Dr. Bhagat/ Dr. Deshpande | | Chintamani College Of Arts Pombhurna | |
| | 15 Gondpipari | 25-01-2024 | D | Dr Patil Sir/Dr. Bhagat | | Chintamani Arts & Science College Gondpipari | |

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीमुळे होणा-या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठस्तरावरुन स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण- २०२४/ प्र.क्र.०१/ विशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०५ जानेवारी, २०२४

**प्रस्तावना-**

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार डॉ.रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गट स्थापन करण्यात आला होता. सदर कार्यबल गटाच्या दि.३० जून, २०२१ रोजीच्या अहवालातील शिफारशींना दि.२७ जानेवारी, २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळातील बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. सदर शिफारशींस अनुसरुन राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची अंमलबजावणीची सुसूत्रता आणण्यासाठी सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली. या सुकाणू समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुपालनाच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांना अभ्यासक्रम आराखड्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून या अभ्यासक्रम आराखड्याची अंमलबजावणी सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावर व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५** पासून सर्व अकृषि विद्यापीठांशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये या अभ्यासक्रम आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी होणार आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण आणि आमूलाग्र व्यापक बदल होत असतांना, त्याविषयीची जनजागृती आणि सातत्यपूर्ण समुपदेशनाची नितांत गरज आहे. या बदलांचा सर्वाधिक परिणाम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांतून इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर होणार आहे. त्या अनुषंगाने, विद्यार्थीकेंद्री शिक्षण धोरणाची मूलभूत तत्त्वे परिणामकारकरित्या प्रत्यक्षात आणावयाची असतील तर, ती या वर्षीच्या १२ वीच्या विद्यार्थ्यांपर्यंत योग्य रितीने पोहचणे गरजेचे आहे.

याशिवाय, असेही निदर्शनास येते की, राज्यातील महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या प्रवेश क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात प्रवेश नोंदणी होऊन जागा रिक्त राहत आहेत. इयत्ता १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेक विद्यार्थी त्यांच्या विविध अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून दूर जात आहेत. अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देताना विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या ऑनलाईन अभ्यासक्रमांबाबतची माहिती त्यांच्या पर्यंत पोहोचवून स्थुल नोंदणी प्रमाण (GER) वाढविणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

त्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठांनी आपल्या परिक्षेत्रातील इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी व्यापक संपर्क अभियान राबवून विद्यार्थ्यांना या शैक्षणिक बदलांबाबत जागृती करणे आवश्यक आहे.

राज्यातील तंत्रनिकेतनांमध्ये स्थुल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी राज्यात १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अशा तंत्रनिकेतनामध्ये राबविण्यात येणारे अभ्यासक्रम, त्यावर आधारीत रोजगाराच्या/ स्वयंरोजगाराच्या संधी यांची माहिती देण्यासाठी स्कुल कनेक्ट उपक्रम राबविण्यात आला होता व त्याचे सकारात्मक परिणाम तंत्रनिकेतनामधील स्थुल नोंदणी प्रमाणात झालेल्या वाढीमध्ये दिसून आले आहे. त्याच धर्तीवर राज्यातील महाविद्यालयांमधील स्थुल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी व राज्यात राबविण्यात येणा-या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० धोरणामुळे होणा-या शैक्षणिक बदलांबाबत व त्याच्या सकारात्मक परिणामांबाबत माहिती होण्यासाठी **"स्कूल कनेक्ट" (NEP कनेक्ट)** हे संपर्क अभियान सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावर राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णयः-**

राज्यातील महाविद्यालयांमधील स्थुल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी व राज्यात राबविण्यात येणा-या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० धोरणामुळे होणा-या शैक्षणिक बदलांबाबत व त्याच्या सकारात्मक परिणामांबाबत माहिती होण्यासाठी **"स्कूल कनेक्ट" (NEP कनेक्ट)** हे संपर्क अभियान सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावर राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर **"स्कूल कनेक्ट" (NEP कनेक्ट)** अभियानाची उद्दिष्ट्ये-

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२० मधील विद्यार्थीकेंद्री बदलांविषयी आणि त्यांच्या हितकारक परिणामांविषयी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणे.
२. विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय लवचिक अभ्यासक्रमांविषयी सविस्तर माहिती देणे.
३. अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट असलेली कल्पक, व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित संबोधनाविषयी विशेषत्वाने माहिती देणे.
४. मूल्यमापनातील श्रेयांक पद्धती आणि त्यामुळे आलेली लवचिकता समजावून सांगणे.
५. कुटुंबाला आधार देण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडून रोजगाराकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांना मुक्त दुरस्थ शिक्षणांच्या संधी विषयी माहिती देणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामिल करुन घेणे.
६. विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्ती विषयी सविस्तर माहिती देणे.
७. विद्यापीठाच्या विद्यार्थी सहायता कक्षाविषयी माहिती देणे.
८. विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध असलेल्या संधी विषयी माहिती देणे.

**स्कूल कनेक्ट संपर्क अभियान कार्यशाळेचे नियोजन -**

(अ) कार्यक्रमाची पूर्वतयारी-

१. हा उपक्रम विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात यावा.
२. सदर उपक्रम **दि.१५ जानेवारी ते दि.३१ जानेवारी** या कालावधीत राबविण्यात यावे.
३. त्यासाठी खालील प्रमाणे विद्यापीठस्तरावर समन्वय समितीची स्थापना करण्यात यावी .
   i. प्र-कुलगुरु (अध्यक्ष),
   ii. सर्व अधिष्ठाता,
   iii. IQAC चे सदस्य,
   iv. संलग्नित महत्त्वाच्या वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य,



Scanned with OKEN Scanner

v. शाळांशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक,
vi. विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश असावा.

४. विद्यापीठाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतूदींनुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमांची आणि इतर योजनांची योग्य आणि अचूक माहितीचे एक सविस्तर टिपण आणि सादरीकरण तयार करावे.

५. या संपर्क अभियानासाठी संवादक म्हणून संवाद कुशल वक्तृत्वगुण असलेल्या विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांमधून साधन व्यक्तींची विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विभागवार निवड करावी.

६. या साधन व्यक्तींचे एक दिवसाचे प्रशिक्षण शिबीर घ्यावे. या शिबीरामध्ये तयार केलेले सविस्तर टिपण आणि सादरीकरण यावर साधकबाधक चर्चा करावी. सामान्यपणे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवरही (FAQ) चर्चा करावी. साधन व्यक्तीचे प्रशिक्षण दिनांक १५ जानेवारी पुर्वी पूर्ण करण्यात यावे.

(ब) संपर्क अभियानाच्या कार्यशाळेसाठी पूर्व नियोजन -

१. विद्यापीठातील परिक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांची यादी तयार करावी. संपर्क अभियानासाठी संलग्नित महाविद्यालयातील योग्य महाविद्यालयाची संयोजक महाविद्यालय म्हणून निवड करावी. या संयोजक महाविद्यालयांनी दोन सत्रांमध्ये कार्यशाळा घ्याव्यात. उपलब्ध सभागृहाच्या क्षमतेनुसार, कार्यशाळेसाठी आसपासच्या ३-४ कनिष्ठ महाविद्यालयातील १२ वीच्या विद्यार्थ्यांना पाचारण करावे.

२. समन्वय समितीने प्रामुख्याने शाळेतील संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयांना प्राधान्य द्यावे.

३. या कार्यशाळांमध्ये इयत्ता १२ वी च्या पुनर्परिक्षार्थींचा विशेषत्वाने समावेश करावा.

४. समन्वय समितीने संपर्क अभियान उपक्रमांचे काटेकोर नियोजन करावे, उपक्रमाचा संयुक्त आराखडा तयार करावा.

५. एकसूत्रतेसाठी संबंधित सर्व प्रमुख व्यक्तींकडे संयोजक महाविद्यालयाचे नाव, सत्रांची तारीख, वेळ, प्रत्येक आमंत्रित कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती, साधन व्यक्तीची माहिती, संपर्क दुवे, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादीचे लेखी टिपण असावे.

६. संयोजन महाविद्यालयाकडे बॅनर/ स्टँडीचा मजकूर रचना, संयोजन महाविद्यालयाला आणि साधन व्यक्तीला देण्यासाठी प्रमाणपत्र,आदरातिथ्यांचे नियोजन याविषयी संपूर्ण माहिती असावी. संयोजक महाविद्यालयाने कार्यक्रमपत्रिका तयार करावी.

७. कार्यशाळेच्या आयोजनासाठी संयोजक महाविद्यालयांना लागणारा प्रत्यक्ष खर्च आणि साधन व्यक्तींचे मानधन, प्रवास खर्च, आदरातिथ्य इत्यादींसाठी लागणारे अपेक्षित अर्थसहाय्य विद्यापीठाच्या योग्य प्राधिकरणांमार्फत मंजूर करुन घ्यावे. त्याविषयीची स्पष्टता संयोजक महाविद्यालयांना द्यावी.

(क) संपर्क अभियान कार्यशाळेदरम्यानची कार्यवाही -

१. संयोजक महाविद्यालयांनी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करावे.

२. अभियानाची सुरुवात विद्यापीठ गीताने व्हावी आणि शेवट राष्ट्रगीताने करावा.

३. साधन व्यक्तीने उद् बोधन करावे, सादरीकरण करावे. सादरीकरणा दरम्यान विचारलेल्या शंकांचे निरसन करावे.

४. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यादी करावी. ज्याचा उपयोग पुढील कार्यशाळेकरीता करता येईल.



Scanned with OKEN Scanner

५. कार्यशाळेसाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे पत्ते, ई-मेल , भ्रमणध्वनी क्रमांक जमा करावे. संयोजक महाविद्यालयांनी त्यासाठी गुगल फॉर्म तयार करावा. गुगल फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थी स्वयंसेवकांनी मदत करावी.
६. उपस्थित विद्यार्थ्यांना "कॅम्पस टूर" विषयी माहिती द्यावी. त्याचा अग्रक्रम नोंदवून घ्यावा.
७. संपर्क अभियानाच्या यशस्वी आयोजनानंतर संयोजक महाविद्यालयांनी अहवाल तयार करावा. तो विद्यापीठाला सादर करावा.
८. गुगल फॉर्म वरुन इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा Data base तयार करावा.
९. कार्यशाळा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठांनी संयोजक महाविद्यालयांकडून प्राप्त अहवालांचे परिशिलन करुन एकत्रित समर्पक अहवाल तयार करावा व या विभागास दिनांक १० फेब्रुवारी पर्यंत सादर करावा.

(ड) कॅम्पस टूर चे आयोजन-

१. संपर्क अभियाना दरम्यान गुगल फॉर्म व्दारे संकलन केलेल्या माहितीच्या आधारे प्राधान्य क्रमानुसार विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयांकडे पाठवावी.
२. विद्यापीठाने आणि महाविद्यालयाने कॅम्पस टूरचे नियोजन करावे. विद्यार्थ्यांना पाचारण करावे.
३. विद्यार्थ्यांना संस्थेची माहिती, पायाभूत सुविधांविषयी माहिती, अभ्यासक्रमांची आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध उपक्रमांविषयी माहिती द्यावी. विविध शिष्यवृत्तींसाठी माहिती द्यावी.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० ची अंमलबजावणी करताना पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच्या जागृतीसाठी संपर्क अभियान-**

१. विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयाच्या पदवीच्या अंतिम वर्षामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे अभियान विद्यापीठ स्तरावरुन तसेच संबंधित संलग्नित महाविद्यालय स्तरावरुन राबवावे.
२. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध उपलब्ध रचनांमध्ये असलेल्या लवचिकते विषयी माहिती द्यावी.
३. Internship विषयी माहिती द्यावी.
४. एकात्मिक पदव्युत्तर अभ्यासक्रम, पीएच.डी. अभ्यासक्रम याविषयी माहिती द्यावी.

या सर्व अभियानाचे समन्वय संबंधित विभागातील सहसंचालक, उच्च शिक्षण हे करतील व या अभियानांतर्गत विद्यापीठांनी राबविलेल्या उपक्रमांचा अहवाल शासनास दिनांक १० फेब्रुवारी पर्यंत सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१०५१७२५२१८६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT DATTATRAYA
KATKAR

(अ. द. काटकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
४. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
५. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
१०. सर्व सह/उप सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner